मा. दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) अंबाजोगाई

कि. दि. दा. क्र. 33/2026
पिंटीराव वि. निरंक
प्रकरण - वारस प्रमाणपत्र

प्रकरणातील अर्जदार क्र. 1 ते 4 यांच्या वतीने खालील प्रमाणे विनंती अर्ज सादर, नि. 13/D




1) हे कि, प्रस्तुत प्रकरणात मा. न्यायालयाने दि. 24/03/2026 रोजी अर्जदारांचा अर्ज ~~[illegible]~~ मंजूर केला आहे.

2) हे कि, प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार आज रोजी मा. न्यायालयात आवश्यक असणारी 200/- कोर्ट फिस भरत आहे. तरी त्यांना कोर्ट फिस भरण्याची परवानगी देणे न्याय व आवश्यक आहे.

तरी विनंती की

Allowed
31/03/2026

अर्ज मान्य करण्यात येवुन प्रस्तुत प्रकरणात अर्जदारांना 200/- कोर्ट फिस भरण्याची परवानगी देणे न्याय व आवश्यक आहे

दि. 31/03/2026

अर्जदारचे विधिज्ञ

[signature]

ॲड. ओ. हा. कोठाळे

MHBI060000982026

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र ३३ /२०२६

## मधील नि.क्र. १ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र (Heirship certificate)मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

२. अर्जदार यांनी कथन केले आहे की, मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांची अर्जदार क्र. १ हे पती आहेत व अर्जदार क्र. २ व ३ ही मुले व अर्जदार क्र. ४ ही मुलगी आहे. दैवशाला भ्र. दिलीप लोमटे, रा. अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड ह्या दिनांक ०१/०५/२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांना अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. त्यांच्या मृत्युनंतर अर्जदारांना शासकीय, निमशासकीय व इतर कामाकरीता वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) आवश्यक आहे.

३. अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ठयर्थ दिनांक १७/०१/२०२६ रोजी ''दैनिक वार्ता'' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेली हरकत नोटीस (निशाणी क्र. १० )

दाखल केली. सदर हरकत नोटीस (निशाणी क्र. १०) यास कोणाचीही हरकत आलेली नाही. त्यामुळे सदर अर्ज हा विना आव्हानीत राहीला आहे. बेलीफ अहवाल निशाणी क्र. ७ पाहीला पाहता, नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड व तहसिल कार्यालय, अंबाजोगाई यांच्या कार्यालयातील बोर्डवर जाहीर नोटीसा डकवण्यात आल्या. अर्जदार यांनी त्यांच्या मागणीच्या पुष्टर्थ दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांचा मृत्युचा दाखला (निशाणी क्र. ०६ ) वर दाखल केले आहे. निशाणी क्र. ०४ वरील यादीप्रमाणे अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डच्या साक्षांकीतप्रती दाखल केल्या आहेत. अर्जदार क्र. ०२ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ११ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी पुरावा बंद झाल्याची पुरशीस निशाणी क्र. १२ वर दाखल केली आहे.

४. अर्जदारांच्या विधिज्ञाचे म्हणणे ऐकले. अर्जदारांच्या विधिज्ञातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांच्या वारसांना त्यांच्या मृत्युनंतर शासकीय व नियमशासकीय कार्यालयीन कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

५. अर्जास विहीत कालावधीमध्ये तसेच आजपर्यंत अर्जदाराच्या अर्जातील मागणीस कोणाचीही हरकत अथवा आक्षेप दाखल झालेला नाही. करीता, अर्जदारांचा पुरावा विना आव्हानात्मक राहीलेला आहे. अर्जदारांनी ते मयताचे कायदेशीर वारस

असल्याचे न्यायालयासमोर शपथेवर सांगितले आहे. त्यांचा पुरावा अविश्वासार्ह आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल नाही. अभिलेखावरील कागदपत्र आणि अर्जदारांचा तोंडी पुरावा विचारात घेतला असे दिसुन येते की, अर्जदार हे वारस प्रमाणपत्र घेण्यास पात्र आहेत. सबब अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांच्या पश्चात अर्जदार क्र. १) दिलीपराव भगवानराव लोमटे, २) मेघराज दिलीपराव लोमटे, ३) युवराज दिलीपराव लोमटे व ४) ज्योती बालासाहेब देशमुख हे मयत दैवशाला भ्र. दिलीप लोमटे यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट१८२७ चे परिशिष्ठ ब प्रमाणे अर्जदार यांनी योग्य ते मुद्रांक शुल्क दिल्यानंतर देण्यात यावा.

24/03/2026

स्थळ-अंबाजोगाई
दिनांक २४.०३.२०२६

(ए.एम.ढवळे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
अंबाजोगाई

**CHALLAN**

**MTR Form Number-6**

| | | | |
|---|---|---|---|
| GRN MH019868590202526U | BARCODE | Date 25/03/2026-13:12:06 | Form ID |

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** District And Sessions Court | | **Payer Details** | |
| **Type of Payment** Service and Service Fees Court fees realised in cash including Amin and Pro | | **TAX ID (Case No.)** | DSCTAX01 |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** CIVIL COURT JR DIVISION AMBEJOGAI | | **Full Name** | Diliprao Bhagwanrao Lomte |
| **Location** BEED | | | |
| **Year** 2025-2026 One Time | | **Flat/Block No.** | Pg. 14 / B |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | **Premises/Building** | |
| 0070028801 Court Fee | 200.00 | **Road/Street** | |
| | | **Area/Locality** | |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | |
| | | **Remarks (Party Details)** | |
| | | MHBI06 | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | **Amount In** | Two Hundred Rupees Only |
| **Total** | 200.00 | **Words** | |
| **Payment Details** STATE BANK OF INDIA | | **FOR USE IN RECEIVING BANK** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 00040572026032501332 | CPAGNCWIG7 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 25/03/2026-13:24:13 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : CMHBI062026289336L

Mobile No. : XXXXXX8382

Defacement No :- 0011/222688202526



Print Date 25-03-2026 01:13:26

**COURT FEES of Rs. 200 /- Paid**

श्रीमती. ए.एम.ढवळे 3रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अंबाजोगाई यांच्या न्यायालयात

<u>वारस प्रमाणपत्र</u>

किरकोळ दिवाणी अर्ज क.33 / 2026
दिलीपराव विरूध्द निरंक
नि-14 / ब

अर्जदार :—
1. दिलीपराव पिता भगवानराव लोमटे वय–76 वर्षे धंदा–शेती रा.काळा मारुती मंदिर जवळ अंबाजोगाई जि.बीड
2. मेघराज पिता दिलीपराव लोमटे वय–45 वर्षे धंदा–शेती रा.काळा मारुती मंदिर जवळ अंबाजोगाई जि.बीड
3. युवराज पिता दिलीपराव लोमटे वय–43 वर्षे धंदा–शेती रा.खडकपुरा अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड
4. सौ.ज्योती भ्र.बालासाहेब देशमुख वय–37 वर्षे धंदा–घरकाम रा.गित्ता ता. अंबाजोगाई जि.बीड

विरुध्द

निरंक

ज्याअर्थी दैवशाला भ्र.दिलीप लोमटे रा.अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि. बीड हे दिनांक 01 / 05 / 2025 रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असे घोषीत करण्यात यावे व तसे वारस प्रमाणपत्र शासकीय, निमशासकीय कामाकरिता मिळावे अशी विनंती केली आहे. ज्याअर्थी दि.17 जानेवारी 2026 रोजीच्या "दैनिक वार्ता, या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रकाशीत करण्यात आले आणि मुदतीत कोणीही वरील अर्जदारांच्या मागणीस आक्षेप नोंदवला नाही तसेच वरील अर्जदार ने या न्यायालयास समाधानकारक पुरावा दिला आहे. त्याअर्थी प्रमाणपत्र देण्यात येते की, वरील अर्जदार हे दैवशाला भ्र.दिलीप लोमटे रा.अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड यांच्या पश्चात त्यांचे कायदेशीर वारस आहेत. करिता हे वारस प्रमाणपत्र आज दि. 31 / 03 / 2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी निर्गमीत करण्यात आले.

31/03/2026

दिनांक :— 31 / 03 / 2026
स्थळ :— अंबाजोगाई

(श्रीमती ए.एम.ढवळे)
3रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अंबाजोगाई

टिप— अर्जदारांना याव्दारे असेही आदेशित करयात येते की, हे प्रमाणपत्र मिळाल्यापासून सहा महिण्यांचे आत अर्जदारांनी या प्रमाणपत्रा आधारे या न्यायालयास त्यांचे ताब्यात असणाऱ्या सर्व मिळकती आणि ठेवी रक्कमा या बाबत सविस्तर यादी सादर करावी आणि त्यानंतर एक वर्षामध्ये सदर मिळकतीचे व ठेवी, रक्कम चे ज्या मिळकती त्यांचे हातात आल्या व त्यावर कसा अंमल केला अथवा त्यांची कशी विल्हेवाट लावली याबाबत खरे व बरोबर हिशोब सादर करावेत.

Received
Adv. O. A. bnalhal